# भारतातील लोकसभा निवडणूका: एक दृष्टिक्षेप

**प्रा. निहाळ रामदास बाबाजी**
राज्यशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय,
बदनापुर ता. बदनापुर जि. जालना.

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाची लोकशाही व्यवस्था बळकट करण्याचे सर्वात मोठे माध्यम म्हणजे निरपेक्षपणे पार पडत असलेल्या निवडणूका होय. निवडणूका शिवाय लोकशाहीला कुठलाही अर्थ प्राप्त होत नाही. राज्यघटनेच्या अमंलबजावणी नंतर भारत एक संसदीय लोकशाही असलेला देश बनला. संसदीय लोकशाहीमध्ये जनता हीच खऱ्या अर्थाने सार्वभौम असते. अशा या सार्वभौम जनतेचे प्रतिनिधित्व लोकशाहीत महत्त्वाचे असते. भारत हा बहूभाषिक, बहूवांशिक, बहूसंस्कृती, जात, धर्म, पंथ असलेला देश आहे. या अनेक विविधता असलेल्या जनतेचे प्रतिनिधित्व खऱ्या अर्थाने लोकसभेच्या निवडणूकांत आपल्याला बघायला मिळते. अशा संपूर्ण भारतीय मतदारांना प्रतिनिधित्व निवडणूकांच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा उमेदवार निवडण्याचा अधिकार दिसून येतो. आपल्या लोकसभेच्या निवडणूका म्हणजे देशाचा प्रत्येक नागरिक या देशातील सत्तेचा मालक व चालक बनू शकतो. लोकसभेच्या आपल्या देशात एकूण १९५२ पासून ते २०१४ पर्यंत १६ निवडणूका पार पाडलेल्या आहेत. या प्रत्येक निवडणूकांत भारतीय मतदार हाच खरा नायक ठरलेला आहे. अंतिम सत्ता ही जनतेची म्हणजे लोकांची आहे हे त्याने दाखवून दिले आहे.

**लोकसभा निवडणुका : पुर्व इतिहास**

भारतीय संसदेचे लोकसभा हे कनिष्ठ, परंतू अधिकाराच्या दृष्टीने वरिष्ठ असे सभागृह आहे. या सभागृहातील सदस्यांची निवड ही प्रत्यक्ष जनतेकडून केली जाते. ज्या व्यक्तीच्या वयाला १८ वर्ष पूर्ण झालेली असतात, असा भारतातील कोणताही नागरिक या मतदान प्रक्रियेत भाग घेत असतो. लोकसभेचे ५३० सदस्य हे घटक राज्याकडून निवडले जातात. तर २० सदस्य हे केंद्रशासित प्रदेशातून निवडले जातात. याशिवाय ०२ सदस्यांची निवड ही (ऑग्लो-इंडियन जमातीच्या) सदस्यांची निवड ही भारताचे राष्ट्रपती करीत असतात. अशा प्रकारे संविधानानुसार ही सदस्य संख्या ही ५५२ एवढी ठरविण्यात आली आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ८२ नुसार असे ठरविण्यात आले आहे की, प्रत्येक जनगणनेनंतर निवडणूक क्षेत्राचा अभ्यास करुन उमेदवाराची संख्या ठरविण्यात यावी. यासाठी एक परिसिमन आयोग (Delimitation Commission) स्थापन करण्यात आला आहे. या आयोगानुसारच मतदार संघात बदल करण्यात येतो. अनुसूचित जाती आणि जमातीसाठी मूळ राज्यघटनेत फक्त १० वर्षासाठी राजकीय आरक्षण लागू करण्यात आले होते. परंतू संविधानामध्ये १०९ वी दूरुस्ती करण्यात येऊन हा कालावधी २५ जानेवारी २०२० पर्यंत करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

प्रस्तुत संशोधनाची उष्टि पुढीलप्रमाणे आहेत -

१) भारतातील लोकसभा निवडणुकीचा विकास अभ्यासणे.

२) लोकसभा निवडणुकामध्ये प्रभाव विविध घटकांचा अभ्यास करणे.

३) भारतातील लोकसभा निवडणुकांचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

**माहिती संकलन व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधनामध्ये एकुण ०८ लोकसभा निवडणुकांचा आढावा घेण्यात आला आहे, कारण भारतामध्ये एकुण १८ लोकसभा निवडणुका झालेल्या आहेत. यामुळे प्रस्तुत संशोधन हे भारतीय लोकसभा निवडणुकांचा विकास व आजपर्यंतची वाटचाल ह्या गोष्टी अभ्यासण्याचे कार्य करण्यात आले आहे.

**०१) पहिली लोकसभा निवडणूक (१९५२) :-**

स्वतंत्र भारताची पहिली निवडणूक ही २१/०२/१९५२ रोजी पार पाडली. या काळात निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री सुकुमार सेन यांनी भूमिका पार पाडली. या निवडणूकीत १७ कोटी ३० लाख मतदारांची संख्या निवडणूक आयोगाने घोषित केली. या निवडणूकीच्या वेळी १४ राष्ट्रीय पक्षांनी सहभाग नोंदविला होता. परंतू लहान मोठया पक्षांची संख्या मिळून एकूण ७५ राजकीय पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. पहिल्या लोकसभेचे गठन ०२/०४/१९५२ रोजी करण्यात आले. या काळातील जनता ही मोठया प्रमाणात निरक्षर होती. राजकीय विचारांची जनतेमध्ये अपरिपक्वता मोठया प्रमाणात होती. जनतेला मतदान करणे सोपे जावे म्हणून मतदानाची पध्दत अत्यंत सोपी ठेवण्यात आली होती. मतदान केंद्रावर राजकीय पक्ष व उमेदवारांचे चिन्ह असलेले वेगवेगळया मतपेटया ठेवण्यात आल्या होत्या. मतदारांना ज्या पक्षाला, उमेदवाराला मतदान टाकायचे त्या मतपेटीमध्ये आपले मत मतपत्रिकेद्वारे टाकत असत.[१] पहिल्या लोकसभेची निवडणूक ही जवळपास चार महिन्या (२५ ऑक्टोंबर १९५१ ते २१ फ्रेबुवारी १९५२) पर्यंत चालली होती. पहिल्या लोकसभेतील सदस्य हे अभिजात वर्गातील होते. तसेच निवडून आलेले बहूतांशी उमेदवार शहरांमध्ये वाढलेले, शिकलेले होते. शिवाय परदेशातील इंग्रजी शाळेमध्ये शिकलेले होते. सगळयात मोठा वर्ग हा वकिलीची शिक्षण घेतलेला होता.

**तक्ता क्र. १**

**पहिल्या लोकसभेच्या निवडणूकीत राजकीय पक्षांनी लढविलेल्या जागा व त्यांना मिळालेल्या जागांची संख्या**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवारांची संख्या | मिळालेल्या जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | काँग्रेस पक्ष | ४७९ | ३६४ | ४४.९९ % |
| ०२ | साम्यवादी पक्ष | ४९ | १६ | ०३.३० % |
| ०३ | समाजवादी पक्ष | २५६ | १२ | १०.६० % |
| ०४ | किसान मजदूर प्रजा पार्टी | १४६ | ०९ | ०५.८० % |
| ०५ | जनसंघ | ९३ | ०३ | ३.१० % |
| ०६ | अन्य पक्ष | ३२७ | ४४ | १६.४० % |
| ०७ | अपक्ष उमेदवार | ५२४ | ४१ | १५.८० % |
| | **एकूण** | **१८७४** | **४८९** | **१००.०० %** |

**०२) दुसरी लोकसभा (१९५७-१९६२) :-**

पहिल्या लोकसभेप्रमाणेच या लोकसभा निवडणूकीत देखील अनेक प्रख्यात व नावाजलेले संसदपटूनी भाग घेतला होता. यामध्ये सत्ताधारी पक्षाकडून पंडित नेहरु, आयगंर, बलदेव सिंह, हरिश्चंद्र माथूर, मौलाना आझाद, फिरोज गांधी, जयसुखलाल, विजय राजे सिंधिया, महावीर त्यागी, सय्यद महमूद, रेणू चक्रवर्ती, सुचेता कृपालानी, हिरेन मुखर्जी, एन.जी. गौर या लोकसभेच्या निवडणूकीत २७ महिला (५.४०%) निवडून आलेल्या होत्या. या लोकसभेच्या कार्यकाळात कॉंग्रेसपक्षाला बहूमत मिळाले होते. त्यामुळे साहजिकच या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख पंडीत नेहरु हे पून्हा भारताचे पंतप्रधान बनले. पंडीत नेहरु यांनी १७ एप्रिल १९५७ ला मंत्रिमंडळाची स्थापना करुन शपथ घेतली. पंडीत नेहरु यांचे हे १९४७ पासून तिसरे मंत्रिमंडळ होते. या लोकसभेच्या कार्यकाळात विरोधी पक्षाची सदस्य संख्या ही अत्यंत कमी होती. परंतू विरोधी पक्ष हा प्रभावशून्य नव्हता. अनंत शयनम आयंगार हे सर्वानुमताने लोकसभेचे सभापती बनले होते.

**०३) तिसरी लोकसभा (१९६२-६७) :-**

तिसऱ्या लोकसभेची निवडणूक ही १६ फेब्रुवारी ते २५ फ्रेबुवारी १९६२ मध्ये पार पाडली. या निवडणूकीमध्ये २१ कोटी ८० लाख मतदारांनी सहभाग नोंदविला. लोकसभेसाठी एकूण ४९४ सदस्य निवडण्यात आले. ३८७ सदस्य हे सर्वसाधारण गटातून तर ७६ सदस्य हे अनुसूचित जातीमधून तर ३१ सदस्य अनुसूचित जमातीमधून निवडण्यात आले. या लोकसभा निवडणूकीत ३५ महिला निवडूण आल्या. राष्ट्रपतीकडून अंग्लो इंडियन समूदायाकडून दोन सदस्य निवडण्यात आले.[३]

**तक्ता क्र. २**

**विभिन्न राजकीय पक्षांना तिसऱ्या निवडणूकीत मिळालेल्या जागा व मतांची टक्केवारी**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | निवडून आलेल्या उमेदवारांची संख्या | एकूण जागांचे शेकडा प्रमाण | मिळालेल्या वैध मतांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | कॉंग्रेस | ३६१ | ७३.५०% | ४४.७२% |
| ०२ | भारतीय साम्यवादी पक्ष | २९ | ५.८०% | ९.९४% |
| ०३ | स्वतंत्र | २२ | ४.४०% | ८.१९% |
| ०४ | जनसंघ | १४ | २.८०% | ६.४४% |
| ०५ | प्रजा समाजवादी पक्ष | १२ | २.४०% | ६.८१% |
| ०६ | द्रविड मुनेत्र कडगम | ०७ | १.४०% | २.०१% |
| ०७ | भारतीय समाजवादी पक्ष | ०६ | १.२०% | २.६९% |
| ०८ | अन्य पक्ष | २३ | ४.६५% | ६.७४% |
| ०९ | अपक्ष उमेदवार | २० | ४.००% | १०.०८% |

स्त्रोत : रिपोर्टस ऑन थर्ड जनरल इलेक्शन, इलेक्शन कमिशन, नई दिल्ली.

वरील तक्ता क्र. २ वरून आपल्या असे लक्षात येते की, कॉंग्रेस पक्षाला सर्वाधिक ३६१ जागा मिळाल्या. हे प्रमाण एकूण ४१० सदस्यापैकी ७३.५० टक्के एवढे असल्याचे दिसून येते. तर या पक्षाला ४४.७२ टक्के एवढे पडलेल्या मतांचे प्रमाण असल्याचे दिसून येते. भारतीय साम्यवादी पक्षाला २९ जागा

मिळाल्या, नव्याने उदय झालेल्या स्वतंत्र पार्टी या पक्षाला २२ जागा मिळाल्या. ८.१९ टक्के एवढे मतांचे प्रमाण या पक्षाला दिसून आले. या निवडणूकीत प्रादेशिक, राज्यस्तरीय पक्षांना देखील मोठया प्रमाणात जागा मिळाल्या व या तिसऱ्यां लोकसभा निवडणूकीत ५५.४२ टक्के लोकांनी मताधिकारांचा प्रयोग केला.[४]

**०४) चवथी लोकसभा निवडणूक (१९६७-१९७०) :-**

१५ फेब्रूवारी १९६७ ते २१ फेब्रूवारी १९६७ या कार्यकाळामध्ये लोकसभेची चवथी निवडणूक झाली. या लोकसभा निवडणूकीत २५ कोटी मतदारांनी ५२० जागांसाठी मतदान केले होते. २३६९ उमेदवारांनी या निवडणूकीत निवडणूक लढविली. या निवडणूकीत ५ उमेदवार हे बिनविरोध निवडून आले होते.

**तक्ता क्र. ३**

**चवथ्या लोकसभा निवडणूकीत राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | लढविलेल्या जागा | मिळालेला विजय | मिळालेल्या मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ५१६ | २८३ | ४०.८० |
| ०२ | स्वतंत्र | १७८ | ४२ | ०८.५० |
| ०३ | जनसंघ | २४९ | ३५ | ०९.३० |
| ०४ | संयूक्त समाजवादी पक्ष | १२३ | २३ | ४.९० |
| ०५ | भारतीय साम्यवादी पक्ष | १०४ | २३ | ४.९० |
| ०६ | प्रजा समाजवादी पक्ष | ११० | १३ | ३.१० |
| ०७ | भारतीय साम्यवादी पक्ष (मार्क्सवादी) | ६३ | १९ | ४.५० |
| ०८ | भारतीय रिपब्लिकन पक्ष | ७२ | ०१ | २.५० |
| ०९ | अन्य राजकीय पक्ष | ८० | ३९ | ७.१० |
| १० | अपक्ष उमेदवार | ३६८ | ४२ | १४.४० |
| | **एकूण** | | **५२०** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. ३ वरुन असे दिसून येते की, लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाला २८३ जागा मिळाल्याचे दिसून येते. परंतू तिसऱ्या लोकसभेच्या जागांच्या तुलनेत मिळालेल्या जागा ७८ एवढया कमी झाल्याचे लक्षात येते. तसेच मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमध्ये ही घट (४०.८० टक्के) झाली. यावरुन कॉंग्रेस पक्षाची लोकप्रियता कमी झालेली दिसून येते. इतर राजकीय पक्षांना देखिल १० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळालेली दिसून येते. स्वतंत्र या पक्षाला ४२ जागा मिळाल्या तर जनसंघाने २४९ जागा लढवून देखील त्यांना ३५ जागा मिळाल्या. संयुक्त समाजवादी पक्षाला २३, भारतीय कम्यूनिष्ट पक्षाला २३, मार्क्सवादी कम्यूनिष्ट पक्षाला १९ जागा मिळाल्या.[५]

**०५) पाचवी लोकसभा (१९७१-१९७७) :-**

पाचवी लोकसभा निवडणूक ही १ मार्च १९७१ ते १० मार्च १९७१ या कालावधीमध्ये पार पाडली. मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या ही २७ कोटी ३० लाख होती. या निवडणूकीत एकूण मतदान हे ५५.२७ एवढे झाले. निवडणूक आयोगाने एक अधिसुचनेदवारे १५ मार्चला लोकसभा निर्माण केली. या निवडणूकीत निवडूण आलेले एकूण ५१५ सदस्य होते. या निवडणूकीत कॉंग्रेसने ४४२ सदस्य निवडणूकीत उभे केले होते. त्यापैकी ३५२ सदस्य निवडूण आले. १७ मार्च १९७१ ला कॉंग्रेसच्या

कोरकमीटीने इंदिरा गांधी यांची सर्वानुमते पंतप्रधान पदासाठी निवड करण्यात आली. १८ मार्च १९७१ ला इंदिरा गांधी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली त्यांच्या बरोबर ३६ मंत्र्यांनी शपथ घेतली. जी. एस. ठिल्लो यांची लोकसभेच्या सभापती म्हणून नव्याने नियूक्ती केली. या ठिल्लो यांनी १९७१ ला अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन १९७५ ला मंत्री पदाची शपथ घेतली. या निवडणूकीच्या कार्यकाळात राष्ट्रपती निवडणूक खूप गाजलेली दिसून येते. या निवडणूकीत फखरुददीन अली अहमद हे राष्ट्रपती म्हणून निवडूण आले.

**तक्ता क्र. ४**

**पाचव्या लोकसभा निवडणूकीत विविध राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा**

| अ.क्र. | राजकीय पक्षाचे नाव | लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| ०१ | राष्ट्रीय काँग्रेस | ३५२ |
| ०२ | भारतीय साम्यवादी पक्ष(CPI) | २५ |
| ०३ | साम्यवादी पक्ष(CPM) | २३ |
| ०४ | द्रविड मुनेत्र कड्गम | २३ |
| ०५ | जनसंघ | २२ |
| ०६ | काँग्रेस (संगठन) | १६ |
| ०७ | स्वतंत्र पक्ष | ०८ |
| ०८ | संयुक्त समाजवादी पक्ष | ०३ |
| ०९ | प्रजा समाजवादी पक्ष | ०२ |

पाचव्या लोकसभेचा कार्यकाळ हा १८ मार्च १९७६ ला समाप्त होणार होता, परंतू तो एका वर्षासाठी वाढवून १८ मार्च १९७७ असा करण्यात आला. पाचव्या लोकसभेने विविध प्रकारचे कामकाज व कायदेकानुन निर्माण करण्यासाठी ४०६७.९ तास काम केले. यामध्ये सर्वात जास्त वेळ हा ११२.१ तास आणि ५२ मिनिटे कायदे निर्माण करण्यासाठी झाला एकूण वेळेच्या २७.५५ टक्केवारी येते. बजेटवरती चर्चा करण्यासाठी २१.६४ टक्के वेळ खर्च करण्यात आला. तर प्रश्नावरती १२.१६ टक्के एवढा वेळ खर्च करण्यात आला. प्रस्ताव ध्यानाकर्षण सुचना, आर्ध्या तासांच्या चर्चा, अल्पकालीन चर्चा, राष्ट्रपतीचे भाषणावरील वाद-विवाद, मंत्र्याचे वक्तव्य इत्यादी कामांवरती संसदेचा वेळ खर्च करण्यात आला.

**०६) सहावी लोकसभा निवडणूक (१९७७-१९७९) :-**

सहाव्या लोकसभेची निवडणूक ही १६, १८, १९ आणि २० मार्च १९७७ ला पार पाडली. म्हणजेच या निवडणूकीत मतदानांची प्रक्रिया चार दिवसातच पार पडली. या निवडणूकीची प्रमुख विशेषत: म्हणजे या निवडणूकीत सर्व विरोधी पक्ष (साम्यवादी पक्ष वगळून) एकत्र आले व त्यांनी सत्ताधारी काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढविली. या विरोधी पक्षांमध्ये काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल आणि समाजवादी पक्ष यांनी एकत्र येऊन निवडणूक लढविली. या सर्वांनी मिळून जनता पार्टी केली. या जनता पार्टीला मात्र निवडणूक लढविण्याची परवानगी मिळाली नाही. लोकशाही काँग्रेसच्या सदस्यांनी नंतर कॉग्रेस संगठन व भारतीय लोकदलाच्या चिन्हांवर निवडणूक लढविली. या जनता पार्टीला अनेक प्रादेशिक पक्षांनी साथ दिली. यामध्ये पंजाबमधील अकाली दल, तामिळनाडूमध्ये डी.एम.के., पश्चिम बंगालमध्ये साम्यवादी पक्ष आणि जम्मू काश्मिरमध्ये नॅशनल कॉन्फरस इत्यादी राजकीय पक्षांचा समावेश होतो.

तक्ता क्र. ५ वरुन असे दिसून येते की, काँग्रेस पक्षाला अगोदरच्या निवडणूकांची आकडेवारी लक्षात घेता प्रथमच एवढया कमी जागा (१५३) मिळाल्या. जनता पार्टीला सर्वात जास्त म्हणजे

२९८ जागा मिळाल्या. जनता पार्टीला प्राप्त मतांची टक्केवारी देखील काँग्रेस पेक्षा जास्त आहे. या निवडणूकीत काँग्रेसला बहूमत सिध्द करता येईल एवढा जागांचा आकडा नसल्यामुळे सर्व प्रथमच काँग्रेस सत्तेतून बाहेर फेकली गेली.

**तक्ता क्र. ५**

**विविध राजकीय पक्षांना सहाव्या लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या जागा**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | निवडणूकीत लढविलेल्या जागा | मिळालेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | काँग्रेस | ४९३ | १५३ | ३४.५४ |
| ०२ | जनता पार्टी + लोकशाही काँग्रेस | ४२३ (३९१+३२) | २९८ (२७०+२८) | ४३.१२ |
| ०३ | भारतीय साम्यवादी पक्ष | ९२ | ०७ | २.८७ |
| ०४ | मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी | ५३ | २२ | ४.३० |
| ०५ | प्रादेशिक पक्ष आणि अपक्ष उमेदवार | १२७८ | ५९ | १५.१७ |

२३ मार्च १९७७ ला जनता पार्टीने आपले सरकार बनवले. या लोकसभेमध्ये एकूण ५४४ सदस्य होते. यामध्ये ५४२ सदस्य हे जनतेकडून निवडून आलेले होते. मोरारजी देसाई यांची पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. मोरारजी देसाई हे पहिले काँग्रेसेत्तर पंतप्रधान होय.[६] या निवडणूकीने प्रथमच देशाल मान्यता प्राप्त विरोधी पक्ष व विरोधी पक्षनेता मिळाला. यशवंतराव चव्हाण यांची या लोकसभेच्या कार्यकाळात विरोधी पक्षनेता म्हणून निवड झाली. तर लोकसभेचे सभापती म्हणून २६ मार्च १९७७ ला नीलम संजिव रेडडी यांची सर्वानुमताने निवड करण्यात आली होती. त्यांनी राष्ट्रपती पदाची निवडणूक लढविण्याचे ठरविल्यानंतर लोकसभेचा सभापती म्हणून राजीनामा दिला व त्यांच्या जागी के. एस. हेगडे जुलै १९७७ ला सभापती बनले.

पाचव्या लोकसभेचा कार्यकाळ एक वर्ष वाढवून तो सहा वर्षाचा करण्यात आला होता. पण सहाव्या लोकसभेच्या कार्यकाळात ४४ वे संशोधन करण्यात येऊन १९७८ ला पून्हा तो कार्यकाळ पाच वर्षाचा केला. पण सहावी लोकसभा ही आपला अर्धा काळ देखील पूर्ण करु शकली नाही. २२ ऑगस्ट १९७९ ला सहावी लोकसभा भंग करण्यात आली. सहाव्या लोकसभेत एकुण १७५३ तास काम करण्यात आले. सर्वात जास्त वेळ हा (४१२ तास २८ मिनिटे) विधेयकावर खर्च करण्यात आला. हे खर्च करण्यात आलेले प्रमाण २३.५१ टक्के येते. बजेटवरती चर्चा करण्यासाठी २३.२६ टक्के वेळ लागला. प्रश्न काळावरती १३.७० टक्के वेळ खर्च करण्यात आला. प्रस्तावावरती १०.७० टक्के एवढा वेळ लागला. उरलेला वेळ हा स्थगन प्रस्ताव, ध्यानाकर्षण, आर्ध्या तासांची चर्चा यावर खर्च केला गेला.

**०७) सातवी लोकसभा (१९८०-१९८४) :-**

सातवी लोकसभा निवडणूक ही ५४२ सदस्यांसाठी लढलेली होती. या लोकसभेमध्ये मतदारांची संख्या ही ३६ कोटी १७ लाख एवढी होती. परंतू ही निवडणूक ५२४ सदस्यांकरीता प्रत्यक्ष लढली गेली. अनुसूचित जातीसाठी ७९ तर अनुसूचित जमातीसाठी ४० जागा या राखिव ठेवण्यात आल्या. या लोकसभा निवडणूकीमध्ये ५६.९२ टक्के मतदान झाले.

**तक्ता क्र. ६**

**सातव्या लोकसभा निवडणूकीत विविध राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | निवडणूकीत उभे राहिलेले उमेदवार | निवडणूकीत मिळालेल्या जागा | निवडणूकीत मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | इंदिरा काँग्रेस | ४८८ | ३५१ | ४२.६६ |
| ०२ | जनता पार्टी | ४३१ | ३१ | १८.९४ |
| ०३ | जनता एस लोकदल | २९१ | ४१ | ९.४३ |
| ०४ | काँग्रेस (अर्स) | २१२ | १३ | ५.३१ |
| ०५ | भारतीय साम्यवादी पक्ष(CPI) | ४८ | ११ | २.६१ |
| ०६ | मार्क्सवादी कम्यूनिष्ट पक्ष (CPM) | ६२ | ३५ | ६.५ |
| ०७ | डी.एम.के. | १६ | १६ | २.१५ |
| ०८ | अकाली दल | ०७ | ०१ | ०.७१ |
| ०९ | जम्मू-काश्मिर नॅशनल कॉन्फरस | - | ०३ | - |
| १० | मुस्लिम लीग | - | ०३ | - |
| ११ | केरळ काँग्रेस (मणि ग्रुप) | - | ०१ | - |
| १२ | क्रांतीकारी समाजवादी दल | - | ०४ | - |
| १३ | महाराष्ट्रवादी गोमांतक पार्टी | - | ०१ | - |
| १४ | अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक | - | ०३ | - |
| १५ | सिक्किम जनता परिषद | - | ०१ | - |

तक्ता क्र. २.२३ वरुन असे दिसून येते की, सातव्या लोकसभेच्या निवडणूकीत इंदिरा गांधी यांना स्पष्ट बहूमत मिळाले त्यांना एकूण ३५१ जागा मिळाल्या. प्राप्त मतांची टक्केवारी ४२.६६ एवढी येते. मात्र सहाव्या लोकसभेच्या निवडणूकीत सत्तेत आलेल्या जनता पार्टी पूर्णत: नेस्तनाबूत झाली. या निवडणूकीच्या वेळी जनता पार्टी बददल जनतेच्या मनात प्रचंड नाराजी होती. मतदार एवढे वैतागले होते की, जनता पक्षाला दारुण प्रभाव स्विकारावा लागला. जनता पार्टीने ४३१ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. पण त्यांना ३१ जागावरच समाधान मानावे लागले. तसेच जनता लोकदल पक्षाला ४१ जागा मिळाल्या तर काँग्रेस अर्सला १३ जागा मिळाल्या. या निवडणूकीत इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा विजय होऊन तो पक्ष पून्हा सत्तेत आला.

या निवडणूकीत जनता पार्टी ही पूर्णत: पोखरली होती. जनता पार्टीचे सर्व नेत्यांना अतिमहत्त्वकांक्षीपणामुळे एकोपा राहिला नाही. इंदिरा गांधी समोरील विरोधी राजकीय पक्षातील नेत्यांच्या मतभिन्नतेमुळे जनता पार्टीचे पूर्णपणे विघटन झाले. त्याचा फायदा श्रीमती इंदिरा गांधी यांना मोठया प्रमाणात

झाला. या निवडणूकीत इंदिरा गांधी यांना अनुसूचित जाती आणि अल्पसंख्यांक समाजाचे ठोस समर्थन मिळाले होते. जनता पार्टीचे अस्थिर वर्तन, स्थिर सरकार न देणे इत्यादी गोष्टी या जनतेला खटकल्या होत्या. याचा फायदा इंदिरा गांधीनी उचलला. या निवडणूकीच्या वेळी श्रीमती इंदिरा गांधी यांनी व्यापक प्रमाणात निवडणूक प्रचार केला. निवडणूक आयोगाकडून ८४ दिवस प्रचारासाठी मिळालेले होते. या काळात त्यांनी ६३५९४ कि.मी. पायी यात्रा केली. ३८४ मतदारसंघात एकूण ५१५ सभांमध्ये भाषण केले. जवळपास २४ कोटी लोकांनी त्यांचे भाषण ऐकले.[७] त्यांनी संपूर्ण निवडणूक प्रचार हा स्वत:ला केंद्रस्थानी ठेऊन केला. मिराचंदाणी यांनी त्याच्या बाबतीत म्हटले की, या निवडणूकीच्या प्रचारात श्रीमती इंदिरा गांधी या धैर्य आणि शक्तीचा परिचय करुन देत, त्यांच्यात प्रचंड आत्मविश्वास झळकत असे, त्याचवेळेस त्यांच्या विरोधकांमध्ये लढण्याची शक्ती क्षीण होत होती.[८]

## ०८) आठवी लोकसभा (१९८४-१९८९) :-

आठव्या लोकसभेची निवडणूक ही २० डिसेंबर १९८४ रोजी २० राज्यात व ९ केंद्र शासित प्रदेशांमध्ये होईल असे निवडणूक आयोगाने घोषित केले. त्यानंतर २४ डिसेंबरला काही राज्यात तर २७ व २८ डिसेंबर १९८५ हया तारखा निवडणूक आयोगाकडून घोषित करण्यात आल्या. यावेळी पंजाबमधील कायदे सुव्यवस्थेमुळे तर आसाम मधील मतदार यादयांच्या त्रूटीमुळे या दोन राज्यातील निवडणूका या नंतर घेण्यात आल्या. [९]

या निवडणूकीमध्ये ७ राष्ट्रीय आणि २७ प्रादेशिक पक्षांनी सहभाग घेतला होता. ही निवडणूक लोकसभेच्या ५१२ जागांसाठी निवडणूक आयोगाने घोषित केली. परंतू प्रत्यक्ष ५०८ जागांसाठी ही निवडणूक लढविण्यात आली आणि या लोकसभा निवडणूकीत ५४८१ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे होते.३२ यापैकी ७० टक्के उमेदवार हे अपक्ष म्हणून उभे होते. ही निवडणूक होण्यापूर्वीची परिस्थिती फार विचित्र बनलेली होती. तिन वर्षापासून पंजाबमध्ये आतंकवादी हल्ले व तणावपूर्ण परिस्थिती होती. जून १९८४ मध्ये आतंकवादयांना हिसकावून लावण्यासाठी सुवर्ण मंदीरात सेना घुसविली होती. याच पार्श्वभूमीवर ३१ ऑक्टोंबर १९८४ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या करण्यात आली. यामुळे सुवर्ण मंदिरातील आतंकवादयाच्या खात्मा करण्यामुळे केंद्रसरकारला कर्तव्याची पावती भारतीय जनतेने दिली तर इंदिरा गांधी यांच्या हत्येमुळे राजीव गांधी यांना आठव्या निवडणूकीत जनतेची प्रचंड सहानुभूती मिळाली. दी टाईम्स ऑफ इंडियाचे संपादक श्री गिरिलाल जैन या लोकसभा निवडणूकीला पंतप्रधान राजीव गांधीसाठी करण्यात आलेला जनमत संग्रह असे नाव दिले आहे.[१०]

वास्तविक पाहता निवडणूकी संदर्भात हीच परिस्थिती होती. जनतेने उमेदवाराचे कार्य व कर्तव्याचा विचार न करता राजीव गांधी आणि त्यांच्या काँग्रेस पक्षाला मतदान केले. या प्रचार काळात काँग्रेसकडून ‘इंदिराजी की याद में, राजीवजी के साथ मे‘ हा नारा देण्यात येत होता. या बरोबरच काँग्रेसकडून भारताची एकता, अखंडता आणि प्रादेशिक स्थिरता हे घोषवाक्य ठरविण्यात आले होते. विरोधी पक्षाकडे निवडणूक लढविण्यसाठी असा कोणताही नारा नव्हता. इंदिरा काँग्रेस या पक्षाला या निवडणूकीत ८० टक्के जागा मिळाल्या. ५०८ उमेदवारांसाठी ही निवडणूक लढविण्यात आली होती. यापैकी काँग्रेसला ४०१ जागा मिळाल्या. या पक्षाला प्राप्त झालेली मते, ही ४९.३ टक्के भरतात.[११] हा एक काँग्रेससाठी रेकॉर्ड ब्रेक विजय होता. इंदिरा काँग्रेस व राजीव गांधीसाठी हा एक अपूर्व आणि भारी विजय होता.

**तक्ता क्र. ७**

**आठव्या लोकसभा निवडणूकीत राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवारांची संख्या | प्राप्त जागा | प्राप्त मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | इंदिरा काँग्रेस | ४८१ | ४०१ | ४९.३० |
| ०२ | जनता पार्टी | २०७ | १० | ७.०३ |
| ०३ | दलित मजदूर किसान पार्टी (लोकदल) | १६८ | ०३ | ५.९१ |
| ०४ | तेलगु देसम | ३२ | २८ | ४.१४ |
| ०५ | काँग्रेस (एस) | ३२ | ०४ | - |
| ०६ | काँग्रेस (ज) | - | ०१ | - |
| ०७ | मार्क्सवादी पक्ष(CPM) | ५९ | २२ | ५.८० |
| ०८ | भारतीय साम्यवादी पक्ष(CPI) | ६२ | ०६ | - |
| ०९ | द्र.मु.क. | - | ०१ | - |
| १० | अन्ना द्र.मु.क. | - | १२ | १.७२ |
| ११ | नेशनल कॉन्फरस | - | ०३ | - |
| १२ | फॉरवर्ड ब्लॉक | - | ०२ | - |
| १३ | मुस्लिम लिग | - | ०२ | - |
| १४ | भारतीय जनता पार्टी | २२६ | ०२ | २.७१ |

वरील तक्ता क्र. २.२४ वरुन असे लक्षात येते की, इंदिरा काँग्रेसने ४८१ जागा लढविल्या यापैकी ४०१ जागा जिंकल्या म्हणजेच सभागृहातील सदस्य संख्येच्या ८० टक्के जागा बळकावल्या. तर जनता पार्टीने २०७ जागा लढवून देखील त्यांच्या पदरात फक्त १० जागा मिळाल्या. लोकदलाने १६८ जागा लढविल्या, त्यांना फक्त ०३ जागा जिंकता आल्याचे दिसून येते. या निवडणूकीत सर्व प्रथमच निवडणूक लढविणाऱ्या भारतीय जनता पक्षाला उभ्या केलेल्या २२६ पैकी केवळ ०२ जागावर समाधान मानावे लागले. तेलगु देसम पक्षाने ३२ जागा लढवून त्यांना २८ जागा मिळाल्या. इंदिरा काँग्रेस वगळता जनता पार्टी, तेलगू देशम, मार्क्सवादी कम्यूनिष्ट पक्ष व नॅशनल कॉन्फरस यांना फक्त जागांचा दूहीरी आकडा गाठता आला. बाकीच्या इतर पक्षांना एकेरी आकडयावर समाधान मानावे लागले. अपक्ष उमेदवार हे ४ हजार उभे होते. त्यापैकी फक्त १० उमेदवारच निवडून येऊ शकले.

या निवडणूकीत इंदिरा गांधी यांनी दहशतवादाविरुध्दची कार्यवाही जनतेच्या मनात घर करुन होती. तसेच या निवडणूकीमध्ये पंतप्रधान पदाचे उमेदवार हे तरुण व स्वच्छ प्रतिमेचे होते. लोकांना संकट काळात शासन स्थिर व निर्णय घेणारे शासन पाहिजे होते. अशा अनेक कारणांमुळे भारतीय जनतेने काँग्रेसच्या पारडयात भरभरुन मते दिली. या निवडणूकीच्या संदर्भात केंद्रिय वित्त मंत्री विश्वनाथ प्रतापसिंह म्हटले होते की, ही निवडणूक राजीव यांची होती. राजीव गांधी या निवडणूकीचे प्रचारक होते. राजीव गांधी उमेदवार होते आणि ते निवडून आले.[१२] विश्वनाथ प्रतापसिंह यांनी केलेल्या या वक्तव्यामध्ये तथ्य दिसून येते. तर राजीव गांधी मिळालेल्या यशाबददल म्हणाले की, भारतीय मतदारांनी देशाची एकता आणि अखंडतेला अधिक महत्त्व दिले.

**समारोप :**

वरील ८ लोकसभा निवडणुकांचे अध्ययन केले असता असे निदर्शनास येते की, या प्रत्येक निवडणुकीमध्ये निवडून आलेली सरकारे व या सरकारानी केलेले लोकसभेमधील कार्य याचा आढावा घेण्यात आला आहे. वरील ८ लोकसभा निवडणुकांचे एक विशिष्ट असे योगदान हे भारतातील लोकशाहीच्या विकासासाठी उपयुक्त ठरलेले आहे.

**संदर्भ :-**

१) वाजपेयी अटल बिहारी, दिनमान. २७ जानेवारी-२ फेब्रुवारी, १९८०. पृष्ठ क्र. २७.
२) The Times of India Nov. १९८४.
३) The Times of India १४ Dec. १९८४.
४) India Today १५ Jan १९८५, (All India congress) Vote ४९.३ page ३०
५) दिनमान १३-१९ जानेवारी १९८५, पृष्ठ क्र. ०७
६) डॉ. काश्यप सुभाष., हमारी संसद (२०११). नवी दिल्ली : नेशनल बुक ट्रस्ट पृष्ठ क्र. २४७.
७) Statistical Report Election Commission of India, १९९१
८) जोशी प्रसाद., दै. लोकमत (९ मार्च २०१४ रविवार). वरिष्ठ संपादक नाशिक.
९) दै. लोकमत., (२० मार्च २०१४). सुपर व्होट पुरवणी.
१०) भारतीय संविधान कलम १६८
११) काश्यप सुभाष, सवैधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष रिसर्च. पृष्ठ क्र. २४८.
१२) भारतीय संविधान कलम १७० (I).